# बृहन्मुंबई महानगरपालिका

## सार्वजनिक आरोग्य खाते

### क्षयरोग रुग्णालय समूह, शिवडी-15.

**काआअ/11440/क्षरुस(वआ) दि.07.02.2023.**

## <u>जाहिरात</u>

सार्वजनिक आरोग्य खात्यांतर्गत क्षयरोग रुग्णालय समूहाच्या आस्थापनेवरील खालील नमूद **'विशेषज्ञ वैद्यकीय सल्लागार'** 4 पदे एका वर्षाकरिता कंत्राटी तत्वावर प्रत्येकी 45 दिवासानंतर एक दिवसाचा तांत्रिक खंड देऊन मासिक ठोस मानधन रु.1,00,000/- (रु. एक लाख फक्त) इतक्या वेतनावर भरण्याकरिता खालील नमूद अर्हता धारण केलेल्या उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

**1) विशेषज्ञ वैद्यकीय सल्लागार-** सुक्ष्मजीवशास्त्र **(Microbiologist) – 1 पद**

<u>शैक्षणिक अर्हता-</u>

(1) उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापिठाची सुक्ष्मजीवशास्त्रामध्ये पदव्युत्तर पदवी (MD Microbiologist) प्राप्त केलेला असणे आवश्यक आहे.

(2) मान्यताप्राप्त विद्यापिठाची पॅथॉलॉजी व बॅक्टेरिऑलॉजी या विषयात पदविका (DPB) असलेल्या उमेदवारास प्राधान्य.

**2) विशेषज्ञ वैद्यकीय सल्लागार-** भूलतज्ञ **(Anaesthetist) – 1 पद**

<u>शैक्षणिक अर्हता-</u>

(1) उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापिठाची भूलशास्त्रामध्ये पदव्युत्तर पदवी (MD Anaesthesia)किंवा पदविका (DA) प्राप्त केलेला असणे आवश्यक आहे.

(2) उमेदवाराला अति दक्षता विभागात कामाचा अनुभव असावा.

**3) विशेषज्ञ वैद्यकीय सल्लागार-** बालरोगतज्ञ **(Pediatric) – 2 पदे**

<u>शैक्षणिक अर्हता-</u>

1) बालरोग शास्त्रातील M.D/ DNB/DCH डीग्री प्राप्त केलेला असणे आवश्यक आहे.

2) बाल क्षयरोग विभागात काम केलेल्या उमेदवारास विशेष प्राधान्य.

**<u>सर्वसाधारण अटी</u> -**

1) विशेषज्ञ वैद्यकीय सल्लागार पदावरिल नियुक्ती भविष्यात कोणत्याही परिस्थितीमध्ये नियमित करण्यात येणार नाही.

2) विशेषज्ञ वैद्यकीय सल्लागार कंत्राटी तत्वावरील पदधारकास दर 45 दिवसानंतर एक दिवसाचा खंड देण्यात येईल.

3) विशेषज्ञ वैद्यकीय सल्लागार कंत्राटी तत्वावरची नियुक्ती आवश्यकता नसल्यास कुठल्याही क्षणी संपुष्टात आणण्यात येईल.

4) विशेषज्ञ वैद्यकीय सल्लागार कंत्राटी तत्वावरची नियुक्ती ही नियमित तत्वावरिल नियुक्तीकरिता ग्राहय धरण्यात येणार नाही.

5) विशेषज्ञ वैद्यकीय सल्लागार नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी पदधारकाने चुकीची माहीती प्रमाणपत्रे/कागदपत्रे सादर केल्याने किंवा कोणतीही माहीती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्याची नियुक्ती रद्दबादल करण्यात येईल.

6) नियुक्तीच्या वेळी 200 रुपयांच्या बॉन्ड पेपरावर विहित नमुन्यातील कंत्राट करार करुन संबंधीत आस्थापनेस 07 दिवसाच्या आत सादर करणे आवश्यक राहील अन्यथा त्याची नियुक्ती रद्दबादल करण्यात येईल.

7) उमेदवाराच्या कंत्राटी तत्वावरिल नेमणूकीनंतर त्रैमासिक अनुपालन अहवाल (performance report) जसे की दैनंदीन उपस्थिती, केलेल्या शस्त्रक्रीयांचा संख्यात्मक व गुणात्मक अहवाल तसेच प्रमुख रुग्णालयात संदर्भित करण्यात येणा-या रुग्णांच्या संख्येतील घट इत्यादिच्या सापेक्ष तीन महिन्यांनी एक दिवसाचा खंड देऊन पुढील कालावधीकरिता म्हणजेच नेमणूक झाल्यापासून संपूर्ण कालावधी दिनांक 22.08.23 पर्यत क्रंत्राटी सेवा पुढे चालू ठेवण्यात येईल.

8) विशेषज्ञ वैद्यकीय सल्लागार कंत्राटी तत्वावरिल पदधारकाने नियुक्ती कालावधीत शिस्तभंग केल्याचे निदर्शनास आल्यास त्याची नियुक्ती तात्काळ रद्द करण्यात येईल.

9) कुठल्याही कारणास्तव पदधारकास पदाचा राजीनामा दयावयाचा असल्यास त्याने एक महिना आधी पुर्वसूचना देणे बंधनकारक आहे.

10) विशेषज्ञ वैदयकीय सल्लागार (Speciality Medical Consultants) क्षयरोग रुग्णालय प्रमूखांच्या अधिपत्याखाली कर्तव्यार्थ राहतील.

11) विशेषज्ञ वैदयकीय सल्लागार संबधीत युनिटमध्ये पूर्णवेळ (सकाळी ८.०० ते दूपारी ४.००) कार्यरत राहतील व रुग्णसेवेच्या आवश्यकतेनूसार रात्रपाळीतही कार्यरत राहतील. गरज भासल्यास आपातकालीन परिस्थितीत इतर विभागातही रात्रपाळीतही आवश्यक सेवा म्हणून काम करावे लागेल.

12) विशेषज्ञ वैदयकीय सल्लागार (Speciality Medical Consultants) यांची रुग्णसेवेच्या आवश्यकतेनुसार इतर रुग्णालयात बदली करण्यात येईल.

13) विशेषज्ञ वैदयकीय सल्लागार यांना चक्रांकीत पद्धतीन साप्ताहीक रजा देण्यात येईल.

14) विशेषज्ञ वैदयकीय सल्लागार आपातकालीन काळात रुग्ण सेवा देण्यासाठी उपलब्ध असतील.

15) पदधारक विहीत अटि पूर्ण करित नसल्याचे कोणत्याही क्षणी निदर्शनास आल्यास त्याची नियुक्ती त्वरित रद्द करण्यात येईल व याबाबत कोणताही पत्रव्यवहार विचारात घेतला जाणार नाही.

16) पदधारकाने विशेषज्ञ वैदयकीय सल्लागार या पदाचे आदेश प्राप्त झाल्यावर सात दिवसाच्या आत त्वरित कर्तव्यार्थ हजर राहावे लागेल अन्यथा सदर पदाच्या नियुक्तीकरिता आपणास स्वारस्य नसल्याचे समजून पुढिल उमेदवाराची नियुक्ती करण्यात येईल.

**कर्तव्ये व जबाबदा-या-**

1) रुग्णाना 24x7 सेवा देणे, बाहयरुग्ण सेवा व आंतररुग्ण सेवा व अतिदक्षता सेवा, शस्त्रक्रीया सेवा इत्यादी रुग्णांशी निगडीत सेवा पूरविणे.

2) क्षयरोग रुग्णालयातील उपलब्ध असलेल्या सेवांच्या क्षमतेचा पूर्णतः वापर करणे.

3) सर्व निवासी, कंत्राटी तसेच निम्नवैदयकीय कर्मचारी वर्गाला क्षयरुग्णांच्या उपचारासंबंधीचे योग्य मार्गदर्शन करणे तसेच त्यांच्या कामाचे पर्यवेक्षण करणे.

4) रुग्णालयीन कामकाजाचा आढावा व पुनर्विलोकन करण्यास प्रशासनास सहाय्य करणे.

5) वरिष्ठ पातळीवरुन वेळोवेळी नेमुन दिलेल्या जबाबदा-या पार पाडणे, वैदयकीय अधिक्षक व खातेप्रमुख यांना वेळोवेळी अहवाल सादर करणे.

वैद्यकीय अधिक्षक क्षयरोग रुग्णालय यांचे कार्यालयात जाहिरात प्रसारित झाल्यापासून (दि. 20.02.2023 ते 06.03.2023) आलेले अर्ज प्रचलित निवड प्रक्रियेनुसार निवडण्यात येतील.

| s/d | s/d | s/d |
|---|---|---|
| **वैद्यकीय अधिक्षक अधिकारी क्षयरोग रुग्णालय समूह** | **संयुक्त कार्यकारी आरोग्य अधिकारी (विशेष रुग्णालये)** | **कार्यकारी आरोग्य अधिकारी** |